माहितीचा
अधिकार

सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग,अमरावती खंडपीठ

## व्दितीय अपील क्रमांक १३४८/२०१८

गोपाल चरणदास राठोड,
रा. धामणदरी, पो. लोहगड,
ता. बार्शीटाकळी, जि. अकोला

अर्जदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी बार्शिटाकळी, (प्रा.)
ता.जि. अकोला

उत्तरवादी

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (वने), अकोला वनविभाग,
अकोला, जि .अकोला

| उपस्थिती: सुनावणी दिनांक १२.०५.२०२२ | व्यक्तीशः/ प्रतिनिधी | नांव |
|---|---|---|
| अर्जदार | व्यक्तीशः | गोपाल चरणदास राठोड |
| ज.मा.अ. | व्यक्तीशः | संतोष गणपत डांगे |
| प्र.अ.अ. | प्रतिनिधी | डी.डी.मदने (प्राधिकृत पत्र अप्राप्त) |

लघुरुपेः जन माहिती अधिकारी करिता ज.मा.अ. तथा प्रथम अपिलीय अधिकारी करिता प्र.अ.अ.

राज्य माहिती आयुक्तः डॉ. विनय कुमार सिन्हा

दिनांकः १२ मे २०२२

## आदेश

१. अर्जदार यांनी माहितीकरिता त्याचे अर्जावर जन माहिती अधिका-याकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचे कळवून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) खाली दाखल केले द्वितीय अपिलावर आयोगाने चौकशी व सुनावणी करण्याचे ठरविले.

| | |
|---|---|
| माहितीचा अर्ज /दाखल दिनांकः | १६.०३.२०१८ |
| ज.मा.अ. यांचे उत्तराचा दिनांकः | |
| प्रथम अपिल अर्ज/ दाखल दिनांकः | १६.०४.२०१८ |
| प्र.अ.अ. यांचा आदेशाचा दिनांकः | २७.०४.२०१८ |
| द्वितीय अपिल अर्ज/ दाखल दिनांकः | १८.०५.२०१८ |
| प्र.अ.अ. यांचा आदेशापासून दिवसः | २१ ; द्वितीय अपिल विहित वेळेत सादर केले |
| सुनावणी सूचना (नोटिस) दिनांकः | २९.०४.२०२२ |

२. अर्जदार यांनी मागितलेली माहितीचे वर्णन (जोडपत्र अ):

१. माहितीचा विषयः आपल्या वन परिक्षेत्रात धामनदरी जुनी या गावातील वन जमीनीवर कोणी अतिक्रमण केले त्यांची नावे

२. २०१६/२०१७ मध्ये सदर जमीनीवरील आपण अतिक्रमण केलेल्या जमीनीवरील अतिक्रमण काढले त्या शेतीवरील अतिक्रमण काढले त्यांना अतिक्रमण धारकांना दिलेल्या नोटीसची सत्यप्रत व त्यांनी नोटीस स्वीकारल्याची सत्यप्रत

३. सदर अतिक्रमण जमीन आपल्या मालकीची आहे त्याचा ७/१२ (सातबारा) व वन्य जमीन असल्याचा नमुना ८ ची सत्यप्रत

४. सदर जमीनीवरील अतिक्रमण काढतांना आपण जेसीपी (JCP) मशीनद्वारे सदर क्षेत्रामध्ये चर खोदले आहे त्या जेसीपी(JCP) मशीनीवर झालेल्या खर्चाची संपुर्ण माहिती व जेसीपी (JCP) धारकांच्या पावती सहीत लेखी माहिती

५. जमीनीवरील अतिक्रमण काढण्याकरीता उपविभागीय स्तरावर शासनाकडून अतिक्रमीत जमीनीवर अतिक्रमण काढण्याकरीता किती निधी मंजुर करण्यात आला त्याची माहिती

६. धामनदरी व्यतीरीक्त आपल्या अधिनियमाखाली असलेल्या वन परिक्षेत्रात किती वन जमीनीवर कोणकोणत्या गावातील लोकांना अतिक्रमण केले होते त्या गावाची नावे व ते अतिक्रमण काढण्याकरिता झालेला खर्च त्यांची सत्यप्रत

७. आपल्या वन परिक्षेत्रा अंतर्गत वन विभाग महाराष्ट्र शासन यांच्या कडून कोण-कोणती विकास कामे उदारनार्थ वृक्ष लागवड, चर खोदणे, शासनाच्या नियमानुसार विकासात्मक कामे करणे या कामासाठी शासनाकडुन किती निधी प्राप्त झाला आणि किती खर्च झाला त्याची प्रत्येक कामाची व प्रत्येक गावात केलेल्या कामाची गाव निहाय माहिती, काम निहाय माहिती व मंजुराचे हजेरी पत्रकाची झेरॉक्स व साहित्य खरेदी केल्यास त्याचे पावतीची झेरॉक्स